महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २४० वे दिनांक : २६/०८/२०२६ वार : बुधवार

## गणपती मिरवणुकीत अंडी फेकण्याचा प्रकार यापूर्वी कधीच नाही : आदित्य ठाकरेंचा सरकारवर हल्लाबोल



**मुंबई** : नाशिक येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याची निकृष्ट दर्जाची कामे, मुंबईत गणपती आगमन मिरवणुकीवर अंडी फेकल्याची घटना आणि राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रलंबित प्रश्न या मुद्द्यांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर आणि विशेषतः मुख्यमंत्री व भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले.

नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना आदित्य ठाकरे म्हणाले, "सध्या कुंभमेळ्यासाठी जो निधी खर्च केला जात आहे, तो खरोखरच भाविकांसाठी, सोयी-सुविधांसाठी आणि मंदिरांसाठी वापरला जात आहे का? नाशिकची सध्याची परिस्थिती अत्यंत विदारक आहे. गंगापूर रोडचे उदाहरण घ्या, तिथे सर्रास झाडे तोडण्यात आली आहेत आणि रस्त्यांची अशी अवस्था आहे की जणू एखादा ट्रक रस्त्याखाली घुसला आहे. दोन आठवड्यांपूर्वी मी स्वतः नाशिकमध्ये होतो, तेव्हा मला तिथे सर्वत्र फक्त खड्डेच दिसले. कुंभमेळ्याच्या नावाखाली अनेक कामे हाती घेण्यात आली आहेत, परंतु एकही काम पूर्ण झालेले नाही आणि जे झाले आहे त्याचा दर्जा अतिशय निकृष्ट आहे."

मुंबईत गणपती बाप्पाच्या आगमन मिरवणुकीवर अंडी फेकल्याच्या घटनेचा आदित्य ठाकरे यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. "हा कायदा आणि सुव्यवस्थेचा अत्यंत गंभीर मुद्दा आहे. मुंबईत यापूर्वी असे प्रकार कधीही घडले नव्हते. साधारणपणे, गणपतीची मिरवणूक प्रत्येक भागातून जाते आणि सर्व धर्माचे लोक बाप्पाचे स्वागत करतात. मात्र या गंभीर घटनेवर मुख्यमंत्र्यांनी अद्याप कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. यामागे कोण होते, कोणाला अटक झाली, काय कारवाई झाली, हे काहीच स्पष्ट नाही. भाजपच्या कार्यकाळातच असे अनुचित प्रकार का घडतात?" असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

राज्यात गेल्या 10 दिवसांपासून सुरू असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरूनही त्यांनी सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले, "तुम्ही राहुल गांधींच्या 'छात्रों की गूंज' या कार्यक्रमात तो विद्यार्थी पाहिला असेल, ज्याने हा प्रश्न उपस्थित केला. राहुल गांधींनी त्या विद्यार्थ्याचे म्हणणे ऐकून घेतले आणि अधिक महत्त्वाचे म्हणजे त्याचा पाठपुरावादेखील केला. आज सर्व राजकीय पक्ष आदिवासी विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाला पाठिंबा देत आहेत. प्रत्येकाला त्यांच्या समस्यांची जाणीव झाली आहे, मात्र दुर्दैवाने राज्याच्या मुख्यमंत्र्यांनाच या विद्यार्थ्यांचे प्रश्न दिसत नाहीत."

## बुलडाण्यात महिलेची रस्त्यावरच प्रसूती

**बुलडाणा** : जिल्ह्यातील मेहकर येथे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे विदारक सत्य समोर आणणारी एक अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. येथील ग्रामीण रुग्णालयापासून अवघ्या 50 ते 100 मीटर अंतरावर एका गर्भवती महिलेची चक्क रस्त्यावरच प्रसूती झाली. धक्कादायक बाब म्हणजे, महिला रस्त्यावर वेदनांनी तडफडत असताना तिला मदत करण्यासाठी ग्रामीण रुग्णालयातील 'स्टाफ नर्स'ने (परिचारिका) येण्यास नकार दिल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. अखेर एका खासगी रुग्णालयातील नर्सच्या मदतीने या महिलेची सुखरूप प्रसूती करण्यात आली.

मेहकर येथे एका महिलेला आज सकाळी सहा वाजेच्या सुमारास अचानक तीव्र प्रसूती कळा सुरू झाल्या. महिलेला रुग्णालयात नेण्यासाठी घरात कोणीही पुरुष मंडळी उपस्थित नव्हती. त्यामुळे ती महिला स्वतः चालत जाण्याचा प्रयत्न करत असतानाच, वेदना असह्य झाल्याने ती रस्त्यावरील एका ओट्यावर कोसळली. यावेळी बाळाचा काही भाग बाहेर आल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर झाली होती.

हा गंभीर प्रकार योगेश सौभागे यांच्या निदर्शनास आल्यानंतर, त्यांनी तातडीने जवळच असलेल्या ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली. तिथे कर्तव्यावर असलेल्या स्टाफ नर्सला त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य समजावून सांगत त्वरित घटनास्थळी येण्याची विनंती केली. मात्र, "रुग्णालयात सध्या डॉक्टर नाहीत, मी एकटीच आहे, त्यामुळे मला रुग्णालयाच्या बाहेर येता येणार नाही," असे उडवाउडवीचे उत्तर देत नर्सने मदतीस नकार दिला. सौभागे यांनी पुन्हा विनंती करत, "महिलेचे बाळ अर्धे बाहेर आले आहे, आम्हाला काय करावे सुचत नाहीये, कृपया तुम्ही सोबत चला," अशी विनंती केली, तरीही शासकीय यंत्रणेने पाठ फिरवली.

शासकीय रुग्णालयाकडून मदत मिळत नसल्याचे पाहून सौभागे यांनी क्षणाचाही विलंब न करता प्रसंगावधान राखले. त्यांनी तात्काळ एका खासगी रुग्णालयातील नर्सशी संपर्क साधून तिला बोलावून घेतले. या खासगी नर्सने सौभागे कुटुंबातील महिलांच्या मदतीने अत्यंत कौशल्याने त्या महिलेची रस्त्यावरच यशस्वी प्रसूती केली. सुदैवाने बाळ आणि बाळंतीण दोघेही सुखरूप आहेत. प्रसूतीनंतर त्यांना पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

या घटनेमुळे मेहकर परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, ऐनवेळी रुग्णांना वाऱ्यावर सोडणाऱ्या शासकीय रुग्णालयातील बेजबाबदार कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## १ लाख ६५ हजार रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठीचे धडे : आणखी ४ महिन्यांची मुदत



**मुंबई** : आणि परिसरातील रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषा शिकवण्याच्या अभियानाला राज्य सरकारने मोठ्या प्रमाणावर राबवले असून आतापर्यंत सुमारे १ लाख ६५ हजार ८०० रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यात आले आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना व्यावहारिक मराठीचे ज्ञान असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मराठी भाषा शिकण्यासाठी इच्छुक असलेल्या चालकांसाठी यापुढेही प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध राहणार असून, त्यासाठी मुंबईसह ठाणे, भिवंडी, नालासोपारा, वसई-विरार आणि नवी मुंबईतील विविध केंद्रांची व्यवस्था केली जाणार आहे. दरम्यान, मराठी भाषा शिकण्यासाठी चालकांना पुरेसा वेळ दिला जाईल; मात्र त्यानंतरही जाणीवपूर्वक मराठी शिकण्यास नकार देणाऱ्यांवर परवान्याबाबत कारवाई केली जाऊ शकते, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी प्रवाशांशी मराठीत संवाद साधावा, या उद्देशाने राज्यात १ मे ते १५ ऑगस्टदरम्यान विशेष अभियान राबवण्यात आले. या अभियानासाठी काही संघटनांनी तीन महिन्यांची मुदत मागितली होती. मात्र, सरकारने १०५ दिवसांचा कालावधी दिला. या काळात राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये सुमारे १८० ठिकाणी कार्यशाळा घेण्यात आल्या. जवळपास १,८०० साहित्यिकांनी विविध ठिकाणी जाऊन रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा आणि मराठी संवादाचे प्रशिक्षण दिले. ठराविक प्रश्नांच्या माध्यमातून चालकांशी संवाद साधून त्यांना दैनंदिन व्यवहारात वापरता येईल, अशा पद्धतीने मराठी शिकवण्यात आली. या अभियानातून तब्बल १ लाख ६५ हजार ८०० रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठीचे प्रशिक्षण मिळाल्याचे प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

या प्रशिक्षणाला चालकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचा दावा सरनाईक यांनी केला. काही अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी मराठी प्रवाशांनी त्यांच्याशी मराठीत संवाद साधल्यास ते केवळ कामाच्या ठिकाणीच नव्हे, तर आपल्या कुटुंबीयांशीही मराठीत बोलण्याचा प्रयत्न करतील, अशी भूमिका व्यक्त केल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राची अस्मिता आणि संस्कृती यांचा आदर करत मराठी भाषेचा स्वीकार करण्याचे आवाहनही सरनाईक यांनी केले.

१०५ दिवसांचे अभियान संपले असले तरी मराठी शिकण्याची इच्छा असलेल्या रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी प्रशिक्षणाची दारे बंद झालेली नाहीत. कोकण मराठी साहित्य परिषद तसेच मराठी साहित्य संघाच्या माध्यमातून इच्छुक चालकांना यापुढेही प्रशिक्षण देण्याची तयारी असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. यासाठी परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना संबंधित केंद्रांची माहिती देण्यात आली आहे. मुंबई, ठाणे, भिवंडी, नालासोपारा, वसई-विरार आणि नवी मुंबईसह अन्य भागांमध्ये प्रशिक्षणाची केंद्रे उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू आहे. चालकांना प्रशिक्षण केंद्रांची माहिती सहज मिळावी यासाठी आरटीओच्या माध्यमातून एक संपर्क क्रमांकही लवकरच जाहीर केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठी शिकण्यासाठी चालकांना पुरेसा वेळ दिला जाणार असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रथम संबंधित चालकाला नोटीस देऊन मराठी शिकण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिला जाईल. त्यानंतर त्याची मौखिक चाचणी घेतली जाईल. एक महिन्यानंतरही मराठीचे आवश्यक ज्ञान प्राप्त झाले नसल्यास पुढील तीन महिन्यांचा कालावधी दिला जाईल. या कालावधीतही चालकाने मराठी शिकले नाही, तर त्याचा परवाना निलंबित केला जाऊ शकतो. मात्र, सुरुवातीच्या टप्प्यात परवाना कायमस्वरूपी रद्द केला जाणार नाही.

एक महिना आणि त्यानंतर तीन महिने असा एकूण चार महिन्यांचा कालावधी देऊनही संबंधित चालकाने जाणीवपूर्वक मराठी शिकण्यास नकार दिल्यास परवाना पूर्णपणे रद्द करण्याची तरतूद असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. १२ ऑगस्ट २०२६ रोजीच्या कायद्यानुसार ही प्रक्रिया असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मराठीच्या मुद्द्यावरून मुंबई आणि ठाण्यातील वातावरण खराब करण्याचा काही जणांकडून प्रयत्न केला जात असल्याचा आरोप सरनाईक यांनी केला. रिक्षा-टॅक्सी चालकांना मोठ्या प्रमाणात दंड करण्यात आला, त्यांना महाराष्ट्रातून बाहेर पाठवले जात आहे किंवा ते आपल्या गावाकडे परत जात असल्याचे दाखवणारे काही व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित होत असल्याचे त्यांनी सांगितले. अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करत सरनाईक म्हणाले की, महायुती सरकार कोणाचाही रोजगार हिरावून घेणारे सरकार नाही. सरकार रोजगार देण्याच्या भूमिकेत आहे. हिंदी आणि मराठी भाषिकांमध्ये संघर्ष निर्माण होईल, अशा पद्धतीने काही व्हिडीओ जाणीवपूर्वक प्रसारित केले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यामुळे रिक्षा-टॅक्सी चालकांनी अफवांवर विश्वास न ठेवता मराठी भाषा शिकावी आणि महाराष्ट्राच्या भाषिक-सांस्कृतिक अस्मितेचा आदर करावा, असे त्यांनी म्हटले.

रिक्षा-टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींशी सरकार चर्चा करत असून, त्यांच्याकडून येणाऱ्या सूचनांचा विचार केला जात असल्याचेही सरनाईक यांनी सांगितले. अबू आझमी यांच्यासह विविध रिक्षा-टॅक्सी युनियनच्या नेत्यांनी या विषयावर संपर्क साधल्याचे त्यांनी सांगितले. संजय निरुपम आणि हाजी अराफात शेख यांच्यासह इतर संघटनांच्या प्रतिनिधींशीही चर्चा झाल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले. कायद्याच्या चौकटीबाहेर कोणी काम करत असेल तर परिवहन विभागाकडून कारवाई केली जाईल; मात्र कोणावरही चुकीच्या पद्धतीने कारवाई केली जाणार नाही, अशी सरकारची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ ऑगस्ट २०२६


## वाचक व्यासपीठ मंचावर कै. द. भा. धामणस्कर यांच्या कवितांचे अभिवाचन!



**छत्रपती संभाजीनगर :** कवीवर्य कै.द.भा.धामणस्कर यांच्या कविता आणि त्यांच्या काव्याविषयी समीक्षालेख अभिवाचनाचा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम जीवन विकास ग्रंथालयात सादर झाला. प्राचार्य जीवन देसाई यांनी या साहित्याचे अभिवाचन केले. जीवन विकास ग्रंथालय, टिळक नगर, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने 'वाचक व्यासपीठ' बैठकीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हा उपक्रम दर सोमवारी सायंकाळी ग्रंथमित्र भा. बा. आर्वीकर सभागृहात होत आहे. 'वाचक व्यासपीठ'च्या तिसऱ्या बैठकीत दि.२४ ऑगस्टला हा कार्यक्रम सादर झाला. कवी द.भा.धामणस्कर यांच्या 'भरून आलेले आकाश' या काव्यसंग्रहातील कवितांचे आणि 'कवितारती'मधील धामणस्कर यांच्या काव्यावरील नीलिमा गुंडी यांच्या लेखाचे व निवडक कवितांचे वाचन जीवन देसाई यांनी केले. या कवितांना जाणकार श्रोत्यांनी उत्तम दाद दिली. या कविता वैशिष्ट्यपूर्ण, विविधांगी आणि उत्तम असूनही कवी धामणस्कर यांना श्रेष्ठ कवी, ख्यातनाम कवी म्हणून सन्मान मिळाला नाही, अशी खंत प्राचार्य जीवन देसाई यांनी व्यक्त केली. सादरीकरणानंतरच्या चर्चेत श्री. माधव देशपांडे, श्री. विजय पाटोदी, श्रीकांत काशीकर, श्री. चिमणपुरे, श्री. किनगावकर आदींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

बैठकीच्या सुरुवातीला डॉ यास्मिन शेख यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजशेखर बालेकर यांनी केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. विनोद सिनकर यांनी केले. या बैठकीला न्या. अंबादासराव जोशी, नितीन कंधारकर, महेश बावस्कर, नृसिंह कुलकर्णी यांच्यासह जाणकार वाचक आणि श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

## शिवपुतळा आगमनानिमित्त वांगी खुर्द येथे विजय म्हस्के पाटील यांच्या पुढाकाराने भव्य रक्तदान शिबीर

**सिल्लोड :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या भव्य आगमनाप्रीत्यर्थ वांगी खुर्द (ता. सिल्लोड) येथे गुरुवार, दि.२७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजेपासून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिवरायांच्या विचारांचा वारसा जपत गरजू रुग्णांना जीवनदान देण्याच्या उद्देशाने केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील आणि समस्त गावकरी मंडळाच्या वतीने हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

या सामाजिक उपक्रमात सर्व शिवभक्त, युवक व ग्रामस्थांनी हिरिरीने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे नम्र आवाहन आयोजकांनी केले आहे.






## राजेंद्र दाते पाटील यांचे अन्न त्याग उपोषण स्थगित




**छत्रपती संभाजीनगर :** शाश्वत मराठा आरक्षणासह इतर महत्वाच्यामागण्यां साठी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने बेमुदत अन्नत्याग उपोषणाला बसलेले ज्येष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी सोमवारी सोळाव्या दिवशी सायंकाळी सहा वाजता अन्न त्याग आंदोलन उपोषण स्थगित केले.जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर आणि त्यांच्या मध्यस्थीने डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी अन्नत्याग आंदोलन उपोषण स्थगित केले आहे.छत्रपती संभाजीनगर येथे गेली १६ दिवसा पासुन मराठा आरक्षण व इतर महत्वपूर्ण मागणी साठी मराठा आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक व न्यायालयातील मराठा समाजाचे वतीने असलेले मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ते डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे अन्नत्याग आंदोलन मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांच्या पुढाकाराने योग्य ते शासनादेश काढुन आणि *कायदेशीर व घटनात्मक आरक्षणा बाबत त्यांनी तयार केलेले पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन*मधील सूचनावर निर्णय घेण्यासाठी मुंबईत कायदा-अर्थ-महसुल विभाग यांचे सोबत मुख्यमंत्र्यांचे उपस्थितीत बैठक घेण्याचे मान्य करण्यात आल्यामुळे अन्न त्याग आंदोलन उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. मुंबईत ठोक मोर्चाचे ठिय्या सुभाष दादा जावळे,रमेश केरे,राहुल पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडो आंदोलक समन्वयकांनी मुंबईत जोरदार ठिय्या आंदोलन करून प्रशासनास सैरभैर केले. मुंबई टीम मराठा क्रांती मोर्चा मुंबईत मंत्री शिवेंद्रराजे भोसले,मंत्री शंभूराजे देसाई, मुख्यमंत्री यांचे कडे मुख्य सचिव श्रीकर परदेशी यांचे कडे निवेदन व सातत्याने अन्नत्याग आंदोलना दरम्यान मुंबईचे रामचंद्र शेडगे.प्रशांत भोसले, सूर्याजी सोनुवले, सुभाष पाटील,अनिल सुर्वे, सदाशिव बानुगडे (दाजी), संतोष शेजवळ,मारुती देसाई,राकेश वासुदेव पांडुरंग रोडे, सुभाष देसाई, दिनेश पवार,शैलेश शिंदे सुशील निकम, विवेक शिंदे आदिनी प्रचंड परिश्रम घेतले. प्रा भानुसे-योगेश शेळके यांची जबरदस्त मांडणी हैद्राबाद गॅझेटीयर मधील त्रुटी-ज्यांच्या कडे पुरावे असतील व वंशावळ जुडत असतील ते सर्व कुणबी म्हणुन पात्र ठरतील परंतु ज्या मराठा समाज बांधवा कडे या पैकी काहीच नाही त्यांचे काय ? यावर अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचा आरक्षण मिळणार नाही तो पर्यंत पादत्राणे न घालण्याचा संकल्प व अनवानी लढा, आरक्षणा वरील तोडगा प्राभावशाली मांडणी करून दडलेली सत्यता पुढे आणण्यात मोलाची भूमिका निभावली. सहा कोटी मराठा समाजाचा आरक्षणाचा विषय आता कायदेशीर व घटनात्मक दृष्ट्या मार्गी लागण्याचे दार उघडले असुन जीवाचा आटा पीटा करून देशातील मराठा आरक्षणाचे सर्वाधीक जास्त दिवसांचे अन्नत्याग उपोषण आंदोलन करणारे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांचे सर्व स्तरातून विशेष आभार व अभिनंदन होत असुन या कामी त्यांना प्रत्यक्ष सहकार्य केल्याबद्दल संभाजी नगर टीम मराठा क्रांती मोर्चा, ठोक मोर्चा विविध मराठा संघटना, विविध धर्मीय नेते, पदाधिकारी, प्रशासन आणि मुंबईतील टीमने उपसमिती च्या अनेक मंत्र्यांना भेटून विशेष प्रयत्न केल्याबद्दल विशेष अभिनंदन होत असुन मराठा आरक्षणाची लढाईही एकट्याचे नसून समाजातील प्रत्येक बांधवाची आहे म्हणुन प्रत्येकाने खारीचा वाटा उचलला तरच सर्व काही शक्य होऊ शकते अशी लोकभावना निर्माण झाली असुन गेल्या १६ दिवसां पासून आरक्षणाचे अभ्यासक जेष्ठ डॉ राजेंद्र दाते पाटील विभागीय आयुक्तालया समोर उपोषण मंत्री गिरीश महाजन यांनी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांना आश्वासन दिले की, प्रकृती सुधारल्या नंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाची मुंबईत समक्ष बैठक घेण्यात येईल. तसेच विभागीय स्तरावरील मागण्यांवर विभागीय आयुक्तांकडून कार्यवाही सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या नंतर विभागीय आयुक्तांच्या वतीने वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी डॉ राजेंद्र दाते पाटील यांना फळांचा रस पाजून स्थागित करण्यात आलेल्या उपोषणाची सांगता केली. यावेळी डॉ.ऋषिकेश कांबळे विनोद काकडे राजेश मुंढे, मुकुंद सोनवणे डॉ.शिवानंद भानुसे लक्ष्मणबापू शिरसाठ, योगेश शेळके धामोरीकर, सुनील कोटकर, विजय काकडे,पंडित बोर्डे,मायनोरीटी कौन्सीलचे शेख मसुद,दिलीप गायकवाड प्रा. मनोहर लोंढे ख्रिस्ती कृती समितीचे विजय (गुड्डू ) निकाळजे,सुभाष वाघुले, शेख राउफ आबेद कादृी,ज्ञानेश्वर गायकवाड, प्रदीप नवले, अमोल साळुंके अमित जाधव,रेखा वाहटुळे, मोहनराव फोलाने, संतोष काळे, बिशप हनोख देवकाते सचिन हिवाळे,अक्षय गायकवाड,जयेश भालेराव विजय जाधव,गौरव राजपूत, रविंद्र वाहटुळे विल्सन गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख मागण्या मराठा-कुणबी नोंद अथवा वंशावळ नसलेल्या मराठा बांधवांना हैदराबाद गॅझेटिअरच्या आधारे कुणबी जात प्रमाणपत्रव जातवैधता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी, एसईबीसी प्रवर्गाला ओबीसी प्रमाणे शिक्षण, नोकरी, शिष्यवृत्ती, शैक्षणिक शुल्क सवलत,वयोमर्यादा वाढव शासकीय योजनांचा लाभ राजकीय आरक्षण वगळता द्यावा, आंदोलना दरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत, सारथी संस्थेला पाच हजार कोटी,तर स्व.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळा ला दहा हजार कोटी रुपयांचा निधी द्यावा.प्रलंबित उमेदवारांना तातडीने नियुक्त्या द्याव्यात, तसेच कायगाव येथे एक एकर जागा व पाच कोटी रुपये डी पी आर साठी देऊन स्व काकासाहेब शिंदे मराठा हुतात्मा स्मारक उभारावे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ ऑगस्ट २०२६


## स्वार्थी दुनियेत मित्रा!

नको मित्रा प्रेम करणं!
मोलाचे वेळ जातं फुकट.
पैका पैका खर्च करून,
वेळ येईल खूप बिकट. १

सजून-धजून तिच्यासाठी,
वेळ अनमोल का गमावितो.
भ्रमनिरास झाल्यावर तू,
मनात दु:ख का लपवितो. २

प्रेम प्रेम काही नसते,
वेळेसोबत करतो घाई.
स्वार्थी दुनियेत मित्रा,
अस्सल प्रेम जळून जाई. ३

लैला-मजनू हिर-रांजा,
यांचे प्रेम निरागस होते.
आज इथे प्रेमामध्ये,
प्रेमवीरांचे बळी जाते. ४

प्रेम करा आई-वडिलांवर,
जीवनातल्या ध्येयावर.
आनंद मिळेल जगतांना,
कमविलेल्या नात्यांवर. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# विद्यापीठाचा यावर्षीचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्रा. डॉ. रामकृष्ण कदम यांना




**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी ,येथे भौतिशास्त्र विभागात कार्यरत असलेले प्रा. डॉ. रामकृष्ण कदम यांना यावर्षीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६८ व्या वर्धापन दिनी मा.कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे , डॉ. बा. आं. म. विद्यापीठाचे प्र.कुलगुरु डॉ. प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. गजानन सानप, प्रा. डॉ. भारत खंदारे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या विशेष समारंभात प्रा. डॉ. रामकृष्ण कदम यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ .कदम हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात अत्यंत मनमिळाऊ व मितभाषी स्वभावाचे म्हणून ओळखले जातात. त्यांच्या अनेक शोधनिबंधांनीं नेहमीचअनेक संशोधकांची आणि अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतले आहे,याशिवाय त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व अध्यापन क्षेत्रात अत्यंत संशोधनात्मक असे भरीव कार्य केलेले आहे.

रचनात्मक संशोधनात त्यांचा सतत वावर राहिलेला आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांच्या संशोधनाची दखल घेतली गेली असून त्यांच्या या मूलभूत व दिशादर्शक संशोधन कार्यप्रणालीची नोंद घेऊनच उत्कृष्ट शिक्षक पुरस्कारासाठी त्यांची निवड केली आहे.त्यामुळे त्यांचा विविध ठिकाणी सन्मान होत असून सर्वत्र कौतुक व अभिनंदन केले जात आहे.


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103





महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ ऑगस्ट २०२६

# वाणिज्य मंडळाचा उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न




**उमरगा :** भारत शिक्षण संस्था उमरगा संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी वाणिज्य मंडळाचा उद्घाटन सोहळा मंगळवारी महाविद्यालयाच्या सभागृहात उत्साहात पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकमान्य महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. बी. बी. जाधव होते. आर. पी. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा. डॉ. रमेश दाबके यांच्या हस्ते वाणिज्य मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले उपस्थित होते.यावेळी प्रा. डॉ. रमेश दाबके म्हणाले, “वाणिज्य शिक्षणातून विद्यार्थ्यांनी केवळ पदवी न घेता बदलत्या उद्योग-व्यवसाय क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करावीत. डिजिटल तंत्रज्ञान, ई-कॉमर्स, बँकिंग, वित्तीय सेवा, डिजिटल मार्केटिंग आणि उद्योजकता या क्षेत्रांत मोठ्या संधी आहेत. विद्यार्थ्यांनी या संधींचा लाभ घेऊन रोजगारासोबतच स्वयंरोजगाराच्या दिशेनेही वाटचाल करावी.”प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांनी वाणिज्य मंडळाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन नेतृत्व व कौशल्यविकास साधावा, असे आवाहन केले. डॉ. अजित अष्टे यांनी प्रास्ताविकातून मंडळाच्या वर्षभरातील उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर, प्रा. डॉ. सुभाष इंगळे, प्रा. डॉ. पी. ए. पिटले, डॉ. खंडू मुरलीकर, डॉ. विजयकुमार मुळे, प्रा. ओम पवार, प्रा. विशाल जाधव, प्रा.सचिन गायकवाड, प्रा. सूरज सूर्यवंशी, प्रा. वर्षा हुलगुडे यांच्यासह वाणिज्य विभागातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन कु. पूजा हांडे हिने केले, तर वैशाली कदम हिने आभार मानले.




## उठ मित्रा जागा हो

दगडाच्या सावलीत
बसून राहू नका रे—
तुमच्या हातात इतिहास
आहे,
तुमच्या डोक्यात मेंदू आहे,
आणि छातीत धडधडणारं
एक जिवंत संविधान आहे!

दगडाला दूध पाजून
तुमच्या लेकराच्या तोंडचं
दूध
काढून घेणाऱ्यांना विचारा
देव मोठा की भूक?

धूप जळत राहिल,
अगरबत्तीचा धूर
आकाशात जाईल ,
पण तुमच्या घरातला
अंधार
तसाच राहिल...

पुजाऱ्याच्या मंत्रांनी
तुमच्या लेकराला नोकरी
मिळणार नाही,
दगडाच्या पायावर डोकं
आपटून
तुमच्या घरात शिक्षण
येणार नाही!

संविधान उघडा—
तिथे तुमचा देव नाही,
पण तुमचा अधिकार आहे!
तिथे चमत्कार नाही,
पण समानतेची हमी आहे!

तुम्हाला हात जोडायला
शिकवणारे
कधी हातात पुस्तक देतात
का?
तुम्हाला नशिबावर
सोपवणारे
कधी तुमच्या हक्कासाठी
लढतात का?

म्हणून मित्रा उठ!
दगड फोडण्यासाठी नाही
दगडाभोवती उभी केलेली
अंधश्रद्धेची भित
फोडण्यासाठी.

मित्रा उठ!
पण मंदिरात धूप
जाळण्यासाठी नाही—
मेंदूत पेटलेला अंधार
जाळण्यासाठी.

आणि लक्षात ठेव—
तुझं भविष्य
कुठल्याही दगडाच्या
कपाळावर लिहिलेलं नाही;
ते तुझ्या हातातल्या
पुस्तकात आहे,
आणि त्या पुस्तकाच्या
पाठीवर
मोठ्या अक्षरांत लिहिलंय
“उद्याचं भविष्य !”

दगड गप्प आहे,
तो हजार वर्षे गप्पच
राहील;
पण तू गप्प राहिलास
तर तुझ्या पुढच्या पिढ्या
तुझ्या गप्पपणाची किंमत
मोजतील!

तू गप्प राहिलास तर
दगड बोलणार नाही,
पण दगडाच्या नावावर
तुझी लूट करणारे
नक्कीच बोलत राहतील.

तुझ्या हातात
पुस्तक देण्याऐवजी
ते तुला नारळ देतील,
प्रश्न विचारण्याऐवजी
तुझ्या कपाळावर राख
फासतील.

तू विचारशील—
“माझं लेकरू शिकेल
का?”
ते म्हणतील—
“देवावर सोपव!”

तू विचारशील—
“माझ्या घरात भाकरी कधी
येईल?”
ते म्हणतील—
“पाप-पुण्याचा हिशेब
कर!”

अरे,
भुकेला माणूस
मंत्राने तृप्त होत नाही,
अन्याय सहन करणारा
आरतीने मुक्त होत नाही!
तुझ्या हातातलं पुस्तक
त्यांना धोकादायक वाटतं,
कारण पुस्तक उघडलं
की प्रश्न जन्माला येतात;
प्रश्न जन्माला आले
की सिंहासनं हादरतात!

म्हणूनच—
पुस्तकं वाच,
डोळे उघड,
प्रश्न विचार,
हक्क माग!

देवाला शिव्या देण्यासाठी
नाही,
माणसाला माणूस म्हणून
जगवण्यासाठी.
मंदिर पाडण्यासाठी नाही,
मनात उभ्या केलेल्या
अंधश्रद्धेच्या भिंती
पाडण्यासाठी.

आणि लक्षात ठेव—
दगडाला मुकुट घातलास
तर दगड राजा होत नाही;
पण माणसाला शिक्षण
दिलंस
तर तो इतिहास घडवतो!

तू गप्प राहू नकोस.
कारण
तुझं मौन म्हणजे
त्यांच्या खोट्याला संमती,
तुझा प्रश्न म्हणजे
त्यांच्या सत्तेला धक्का,
आणि तुझं संविधान
म्हणजे—
तुझ्या मानेवरची बेडी
तोडणारा
कायद्याचा जिवंत हात!



**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ ऑगस्ट २०२६


## अंकुश सोनवणे यांना पीएच. डी. प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** अंकुश सोनवणे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून इतिहास विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. 'वारकरी संप्रदायातील वारीची परंपरा : एक अभ्यास' या विषयावर विद्यापीठात संशोधन प्रबंध सादर केला होता. लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जिल्हा जालना येथील इतिहास विभागप्रमुख डॉ. एस.पी. टकले यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. यांच्या या कार्यासाठी विद्यापीठातील इतिहास विभागप्रमुख डॉ. गीतांजली बोराडे मॅडम, प्राचार्य भारत खंदारे, प्राचार्य नवनाथ आघाव, विद्यापरिषद सदस्य डॉ. नरेंद्र काळे, डॉ. राजेश करपे, अॅड. दत्ता भांगे, डॉ. वेंकटेश लांब, प्रा. हरिदास सोमवंशी, इतिहास अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. हरी जमाले, तसेच डॉ. संदेश वाघ, डॉ. रामकुमार प्रधान, डॉ. लहू गायकवाड यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## कुऱ्हाडी ग्रामपंचायतीतील गैर व्यवहाराचे आरोप निराधार



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील मौजे कुऱ्हाडी येथील ग्रामपंचायतचे गैर कारभारा झाल्या बाबत प्रसार माध्यमातून आरोप करण्यात आले आहे हे सर्व आरोप निराधार खोटे असून राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे कुऱ्हाडी गावाचे सरपंच सौ.रामकोर गोविंद राठोड यांनी स्पष्ट केले आहे ग्रामपंचायच्या वतीने केलेल्या १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत निधी लाटला असून एकच कामाचे दोन वेळा बिल उचलण्याचा आरोप करण्यात आला असून हे आरोप पूर्णत: बिनबुडाचे आहे कारण दोन्ही काम वेगळ वेगळे असून दोन्ही कामाचे देयक, कामाची नोंद,एमबी रेकार्ड,व दोन्ही वेगवेगळे कामाचे फोटो व शूटिंग उपलब्ध असून कोणत्याही सक्षम यंत्रणेमार्फत चौकशी करण्यास हरकत नसल्याचे प्रसिद्धी पत्राद्वारे म्हटले आहे ग्रामपंचायत काही सदस्यांनी केलेली तक्रार ही राजकीय हेतूने प्रेरित असून २०२४ साली झालेले काम शासनाचे नियम व अटीप्रमाणे करण्यात आले त्याची चित्रीकरण व फोटो उपलब्ध असून दुसरे काम २०२६ साली करण्यात आले कामाचे फोटो व चित्रीकरण उपलब्ध असून दोन्ही काम वेगवेगळ्या असून सदर कामाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून ग्रामपंचायत मार्फत केलेल्या कामाची प्रत्यक्षात पातळणी करावी अशी मागणी केली आहे तसेच चौकशीत तक्रारदाराने केलेले आरोप खोटे सिद्ध झाल्यास संबंधित तक्रारदारावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

## भंडारदरा येथे महिला महाविद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात




**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थिनींना पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे जाऊन निसर्ग, पर्यावरण, इतिहास, संस्कृती आणि स्थापत्यकलेचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, तसेच त्यांच्यामध्ये सांघिक भावना, सहकार्य, शिस्त, जबाबदारी आणि सामाजिक जाणीव विकसित व्हावी, या व्यापक शैक्षणिक उद्देशाने मराठवाडा लिगल अॅण्ड जनरल एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या वतीने दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी भंडारदरा येथे एकदिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले.सकाळी ६.१० वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणातून सहलीला उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल यांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून व 'बस'ला हिरवा झेंडा दाखवून सहलीचा शुभारंभ करण्यात आला. या शैक्षणिक उपक्रमात ७२ विद्यार्थिनींसह एकूण ८२ जणांनी सहभाग नोंदविला. सहलीचे नियोजन व व्यवस्थापन वरिष्ठ महाविद्यालयाच्या सहल समिती प्रमुख डॉ. मीनल श्रीगिरीवार आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या सहल समिती प्रमुख डॉ. प्रभाकर गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सहल समिती सदस्य डॉ. मीनाक्षी देव यांच्यासह प्रा. रविंद्र परभाणे, प्रा. श्याम घोरतळे, प्रा. ज्योती मंठाळकर, डॉ. प्रतिभा धोंडकर, प्रा. विशाखा जोशी, प्रा. अश्विनी शहाणे तसेच श्री. उमेश शेट्टे यांनी सहलीच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले. महाविद्यालयातून भंडारदऱ्याकडे जाताना विद्यार्थिनींनी गाणी, गप्पा, हास्यविनोद तसेच विविध मनोरंजक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रवासातील आनंददायी वातावरणामुळे विद्यार्थिनींमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. विद्यार्थिनींची सुरक्षितता, वेळेचे नियोजन, अल्पोपहार आणि भोजन यांची सहल समितीच्या वतीने योग्य प्रकारे व्यवस्था करण्यात आली होती.भंडारदरा परिसरात पोहोचल्यानंतर विद्यार्थिनींनी रंधा वॉटरफॉल, कोलटेंभे येथील वसुंधरा वॉटरफॉल, न्हानी वॉटरफॉल तसेच अमृतेश्वर मंदिर या प्रमुख स्थळांना भेट दिली. पावसाळ्यात बहरलेली हिरवाई, फेसाळणारे धबधबे, डोंगररांगा, जलसंपदा आणि मनोहारी निसर्गदृश्ये यांचा विद्यार्थिनींनी मनमुराद आनंद घेतला.धबधब्यांचे जलचक्र, परिसरातील जैवविविधता, पावसाळी पर्यावरण आणि निसर्ग संवर्धनाचे महत्त्व यांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थिनींना मिळाला. त्यामुळे पर्यावरणाविषयीची जाणीव आणि निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक समृद्ध होण्यास मदत झाली.सहलीतील विशेष आकर्षण ठरलेल्या अमृतेश्वर मंदिराच्या भेटीदरम्यान विद्यार्थिनींना प्राचीन स्थापत्यकला, मंदिराची रचना, शिल्पकला, कलाकुसर आणि महाराष्ट्राच्या ऐतिहासिक - सांस्कृतिक वारशाची माहिती घेण्याची संधी मिळाली. वर्गखोल्यांमध्ये शिकलेल्या इतिहास आणि संस्कृतीच्या संकल्पना प्रत्यक्ष वास्तूच्या माध्यमातून अनुभवता आल्याने विद्यार्थिनींच्या ज्ञानात अधिक भर पडली.ही सहल केवळ मनोरंजनापुरती मर्यादित न राहता 'अनुभवातून शिक्षण' या संकल्पनेचा प्रभावी प्रत्यय देणारी समूहभावन विकसित करणारी ठरली. निसर्ग, पर्यावरण, इतिहास, संस्कृती आणि स्थापत्यकलेचा प्रत्यक्ष अनुभव घेत असतानाच विद्यार्थिनींनी परस्पर सहकार्य, वेळेचे भान, शिस्त, जबाबदारी, सामूहिक निर्णयक्षमता आणि सामाजिक जाणीव यांचेही धडे घेतले.महाविद्यालयीन जीवनात अशा शैक्षणिक सहली विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकासाला नवी दिशा देतात. अभ्यासक्रमातील ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाल्याने विद्यार्थिनींच्या निरीक्षणशक्तीला चालना मिळते आणि त्यांच्या विचारविश्वाचा विस्तार होतो.संपूर्ण सहल अत्यंत नियोजनबद्ध, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सर्व विद्यार्थिनींनी सुरक्षिततेच्या नियमांचे व शिस्तीचे काटेकोरपणे पालन करत सहलीचा मनमुराद आनंद घेतला. दिवसभराच्या या शैक्षणिक सफरीतून ज्ञान, निसर्गानुभव, आनंद आणि मैत्रीच्या अविस्मरणीय आठवणींची शिदोरी घेऊन सर्वजणी सुखरूप महाविद्यालयात परतल्या. भंडारदरा येथील ही शैक्षणिक सहल विद्यार्थिनींसाठी ज्ञानवर्धक, अनुभवसमृद्ध, आनंददायी आणि संस्मरणीय ठरली. महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या उपक्रमातून शिक्षण हे केवळ वर्गखोलीपुरते मर्यादित नसून निसर्ग, इतिहास आणि समाजाच्या प्रत्यक्ष अनुभवातूनही समृद्ध होते, हा संदेश अधोरेखित झाला.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २६ ऑगस्ट २०२६


## इकरा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी बारी समाज विद्यालयातील विद्यार्थिनींना दिली वृक्षांची भेट





**जळगाव :** पैगंबर हजरत मोहम्मद (स.) यांच्या जयंतीनिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'प्रोफेट फॉर ऑल' या उपक्रमांतर्गत इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थिनींनी पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी संदेश दिला. शाळेच्या इको क्लबच्या विद्यार्थिनी सदस्यांनी बारी समाज विद्यालयातील विद्यार्थिनींना घनदाट वाढणारी व सावली देणारी विविध रोपे भेट म्हणून दिली.पर्यावरण स्वच्छ व निरोगी ठेवणे, परिसरात हिरवाई वाढवणे आणि भावी पिढ्यांसाठी सुरक्षित पर्यावरण निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. केवळ वृक्षारोपण न करता वृक्षांचे संगोपन करण्याचा संदेशही यावेळी देण्यात आला. इकरा पब्लिक स्कूलमध्ये पैगंबर हजरत मोहम्मद (स.) यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'वृक्ष भेट' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.यावेळी इकरा पब्लिक स्कूलचे प्राचार्य शेख शकील यांनी हजरत मोहम्मद पैगंबर (स.) यांची पर्यावरण संवर्धनास प्रेरणा देणारी प्रसिद्ध हदीस सांगितली. ते म्हणाले, "कयामत आली आणि तुमच्यापैकी कोणाच्या हातात रोप असेल व ते लावण्याची संधी असेल, तर त्याने ते रोप लावावे."या हदीसी संदेशातून परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी सत्कर्म करत राहण्याची आणि आपल्या परीने सकारात्मक योगदान देण्याची प्रेरणा मिळते.आज लावलेले एक रोप उद्याच्या पिढ्यांसाठी सावली, शुद्ध हवा आणि जीवनाची आशा देऊ शकते, असेही प्राचार्य शेख शकील यांनी नमूद केले.या उपक्रमास शालेय समिती चेअरमन व सेवानिवृत्त नायब तहसीलदार श्री दिलीप बारी,शाळेचे मुख्याध्यापक श्री.आर.एस आंबटकर, शिरसोली प्र बो.चे उपसरपंच श्री डिगंबर खलसे,शिरसोली प्र.न चे पोलीस पाटील श्री श्रीकृष्ण वराडे, बारी पंच अध्यक्ष रतन काटोले,भागवत ताडे,आर. के.पाटील सर, मोहसिन खान यांच्यासह शाळेतील शिक्षक व पदाधिकारी उपस्थित होते. 'पैगंबरांचा संदेश—मानवतेसोबत निसर्गाचीही सेवा' असा सुंदर संदेश देत विद्यार्थिनींनी राबविलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

## माळीवाडा येथील अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता



**कन्नड (अरुण थोरात) :** काल्याचे कीर्तन हे इतर कीर्तनापेक्षा नेहमीच वेगळे असते. कुठल्याही अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याशिवाय होत नाही. काल्याच्या पंगतीत भगवान श्रीकृष्ण प्रसाद वाटतात. सदा, सर्वदा, अखंडपणे हरिभक्ती करावी.काल्याच्या कीर्तनातून भगवान श्रीकृष्ण यांचे चरित्र वर्णन केले जाते, त्यातही ते गोकुळातीलच सांगितले जाते, असे विवेचन ह.भ.प. राजेंद्र महाराज केकत (निभोरा ता. जामनेर जिल्हा जळगाव) यांनी केले. शहरातील माळीवाडा परिसरातील हनुमान मंदिरात दि.१७ ऑगस्ट पासून सुरु झालेल्या अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता दि.२५ ऑगस्ट रोजी झाली. या सोहळ्यातील काल्याचे कीर्तन करताना ते बोलत होते. या कीर्तन सेवेसाठी त्यांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची चार चरणाची कोणी एकी भुलली नारी I विकिता गोरस घ्या म्हणे हरी II देखिला डोळा बैसला मनी I तो वदनी उच्चारी II आपुलिया विसर भोळा I गोविंद कळा कौतुके II तुका म्हणे हासे जन I नाही कान ते ठायी II ही गवळण निवडली होती. आपल्या कीर्तनसेवेत केकत महाराज पुढे म्हणाले की,भक्तांच्या आणि जगाच्या कल्याणासाठी देवाने आजवर हजारो अवतार घेतले आहेत.तर केवळ आपल्या भक्तांचे ॠण फेडण्यासाठी देवाने श्रीकृष्ण अवतार घेतला. कंस राजाच्या आदेशावरुन आकुर कृष्णाला घेण्यासाठी गोकुळात आले त्यावेळी तेथील गवळनींच्या मनाची झालेली उलघाल याचे महाराजांनी, विविध दाखले देत आपल्या मधुर स्वरात वेगवेगळ्या गवळणी गाऊन खूप सुंदर असे वर्णन केले. मृदूंगाचार्य ॠषिकेश महाराज कऱ्हाळे, मनिष महाराज झाल्टे, श्रीराम सोनवणे, मारोतीआप्पा सिरसाठ, राजू चव्हाण, हार्मोनिअम राजू जहागीरदार, शेषराव पाटील यांच्यासह गायनाचार्यांनी सुरेख अशी साथसंगत दिली. कार्यक्रमास कन्नड शहरासह पंचक्रोशीतील भाविक भक्त,महिला, पुरुषांसह युवक तरुण, तरुणींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समस्त माळी पंच यांच्यासह तरुण युवक मंडळांनी पुढाकार घेऊन सहकार्य केले. महाप्रसादाने या धार्मिक सोहळ्याची सांगता करण्यात आली.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com